R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५३ वे, अंक १०वा, मुंबई । डिसेंबर २०२२
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 53, Issue : 10, Mumbai I December 2022
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण राष्ट्रीय रौप्य महोत्सवी परिषद





देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५३वे, अंक १०वा,
डिसेंबर २०२२
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in























# राष्ट्रीय परिषद वृत्त २०२२

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेची रौप्य महोत्सवी राष्ट्रीय ऋग्वेद परिषद दि. १२ व १३ नोव्हेंबर २०२२ रोजी दादा भगवान दास तीर्थक्षेत्र, केलनपुरी, वडोदरा (गुजरात) येथे संपन्न झाली. ध्वजवंदन, गौपूजन, आर्शिवचनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यास श्री. शैलेशभाई मेहता आमदार दर्भावती डबोई, केऊरभाई रोकडीया महापोर वडोदरा, सौ. नंदाबेन जोशी उपमहापौर वडोदरा, विलास जोशी मध्यवर्ती संस्था अध्यक्ष, ॲड्. श्री. अवधुत सुमंत स्वागताध्यक्ष, श्री. मुकुंदराव कुलकर्णी संमेलनाध्यक्ष, प्रभाकर कुलकर्णी मध्यवर्ती संस्था कार्याध्यक्ष, नितिन शहापुरकर बडोदा संस्था अध्यक्ष, माधवीताई मोगरकर, रोहिणी तडवळकर यांच्या उपस्थितीत पार पडले. या राष्ट्रीय परिषदेस देशभरातून आठशेहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजातील भाऊराजे जहागिरदार (हैद्राबाद), डॉ. हरी महाशब्दे (अकोला), विलास जोशी (ठाणे), मुकुंद कुलकर्णी (नाशिक), सचिन खेडेकर (मुंबई), ऋता कळमणकर (ठाणे), डॉ. श्रीकांत येळेगावकर (सोलापूर), श्रीराम कुलकर्णी (मुंबई), उदय तारदाळकर (मुंबई), शरदचंद्र झरेगावकर, अरविंद नांदापूरकर, ले. जनरल संजय कुलकर्णी, प्रवीण दिक्षीत तसेच इतरही मान्यवरांचा ऋग्वेद भूषण / उद्योग भूषण / समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ॲड्. कै. माधवराव अनगळ, माजी शिक्षक आमदार कै. प्रभाकर संत, कै. महादेव विष्णू उर्फ तात्या जोशी यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच या रौप्य महोत्सवी परिषदेनिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य आणि मान्यवरांच्या मुख्य उपस्थितीत करण्यात आले.

संमेलनामध्ये मोहनबुवा रामदासी, प्रवीण दिक्षित, आशुतोष राराविकर, श्रीराम कुलकर्णी, उदय तारदाळकर, मंजुषा कुलकर्णी, माधवीताई मोगरकर, सचिन खेडेकर, डॉ. निरज रायते, श्रीपाद कुलकर्णी, श्रीराम कुलकर्णी, अरुंधती दिक्षित, अतुल खिरवडकर, संजय कुलकर्णी, डॉ. जितेंद्र जोशी यांनीही आपले विचार मांडले. बडोद्याचे महापौर केऊरभाई रोकडीया, उपमहापौर नंदाबेन जोशी यांनी शुभेच्छापर मार्गदर्शन केले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाने गेली ८५ वर्षाहून अधिक ज्ञातीसाठी व सर्व समाजासाठी करीत असलेल्या सामाजिक कार्याचा गौरवपर उल्लेख करून संस्थेस सर्वोत्तपरी सहकार्य करण्याचे आणि संस्थेकडून अधिकाधिक सामाजिक कार्य व्हावे अशा शुभेच्छा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. प्रथम दिवसीय दुसऱ्या सत्रात श्री. सचिन खेडेकर यांची मुलाखत आणि श्री. अशोक नायगावकर आणि कवी अरुण म्हात्रे यांच्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने तसेच हेमंत बर्वे वाद्यवृंद यांची 'संगीत संध्या' हा सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रमाने या परिषदेत रंगत आणली. स्थानिक वडोदरा संस्थेच्यावतीने पारंपारीक गरबा नृत्याचे सुंदर आयोजन करण्यात आले होते. परिषदेत सहभागी असलेले सर्व मान्यवर या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या परिषदेत महिलांसाठी स्वतंत्र चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यात माधवीताई मोगरकर, रोहिणी तडवळकर, अरुंधती दिक्षित, स्वाती

शहापुरकर, शमिका कुलकर्णी, मंजुषा कुलकर्णी, ॲड्‌. मंजुषा अनगळ, केतकी कुलकर्णी यांचा सहभाग उल्लेखनीय होता. या महिला सत्राचे सुत्र संचालन प्रतिभा मोकाशी यांनी केले. डॉ. ज्योती कुलकर्णी व डॉ. शुभदा शहापुरकर यांनी या परिषदेत वैद्यकीय मदत उपलब्ध करुन दिली.

अठरा वर्षानंतर होणाऱ्या या परिषदेस समाजाने एकत्र येऊन अधिकाधिक समाजकार्य हाती घेण्याचे आवाहन संमेलनाध्यक्ष मुकुंदराव कुलकर्णी यांनी केले. संस्थेमार्फत गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना कर्जरुपी सहाय्य, समाजातील गरजू व्यक्तींना वैद्यकीय मदत, संस्थेच्या दादर येथील वास्तूत वाचनालय, अभ्यासिका तसेच संस्कृती संवर्धनासाठी निरनिराळे उपक्रम हाती घेण्याचा निर्धार संस्थेचे अध्यक्ष विलास जोशी, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी व्यक्त केला. रौप्य महोत्सवी परिषदेची संपूर्ण तयारी, खान-पान सेवा, वाहतुक सेवा, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्थेची अतिशय सुंदर आखणी बडोदे संस्थेने केली, त्यास्तव नितिन शहापुरकर, मिलिंद तट्टू, उमेश सुरतकर, पूर्णेंदू शहापूरकर, चंद्रशेखर रामतीर्थ, शरद करोडे आणि सर्व वडोदेकर पदाधिकाऱ्यांचा मध्यवर्ती संस्थेमार्फत सन्मान करण्यात आला. दर दोन वर्षानी परिषदेचे आयोजन करावे अशी मागणी या रौप्य महोत्सवी परिषदेत अनेकांनी केली. या परिषदेत काही समाजोपयोगी ठरावही मंजूर करण्यात आले. ही परिषद कोणत्याही वादविवादाशिवाय तसेच अडथळ्याशिवाय अतिशय आनंदात पार पडली. मध्यवर्ती मंडळ व वडोदरा संस्थेतर्फे एका गरीब शेतकऱ्यास 'गाय-वासरु'चे दान देण्यात आले. या रौप्य महोत्सवी परिषदेनिमित्त जाहिरातदार, देणगीदार, प्रायोजक, दादाभगवान तीर्थक्षेत्र येथील निवासाची व्यवस्था तसेच सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि या राष्ट्रीय परिषदेस सहकार्य करणाऱ्या तसेच या परिषदेचे वृत्त संकलन केल्याबद्दल सर्व स्थानिक वर्तमान पत्र आणि पत्रकारांचे आणि सर्व ज्ञात अज्ञातांचे आभार श्री. प्रभाकर कुलकर्णी, कार्याध्यक्ष यांनी मानले.

द्वि दिवसीय रौप्य महोत्सवी परिषदेच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन मिलिंद सरदेशमुख व आनंद कुलकर्णी यांनी केले. नितिन शहापुरकर यांनी आभार प्रदर्शन केले. पसायदान आणि राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**मिलिंद सरदेशमुख**
परिषद संयोजक

## श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचा आगमन सोहळा

रामदासी श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेतर्फे श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे आगमन व प्रचार दौरा दि. ०४ जानेवारी ते १६ जानेवारी २०२३ रोजी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, लक्ष्मीनारायण बाग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या दिवसांत श्री समर्थ पादुकांसमोर सज्जनगडावरील दैनंदिन कार्यक्रम, स. भ. योगेशबुवा यांचे प्रवचन, पूजा, अर्चा, उपासना तसेच कीर्तन, भजन इत्यादी कार्यक्रम होणार आहे. मुंबई विभागातील समस्त जनतेने या अलौकिक दुग्धशर्करा योगाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

संपर्क क्र. : ०२२-२४३०२२७३/२४३०७५७३



# अभिप्राय

**ॲड. ज्ञानेश रेठरेकर, ठाणे** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, वडोदरा तर्फे आयोजित आणि अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई तर्फे मार्गदर्शन आणि सहकार्याने पार पडलेले दिनांक १२ व १३ नोव्हेंबर२०२२ रोजी असलेले आपले संमेलन अतिशय छान आणि दिमाखदार झाले. त्याबद्दल आपले आणि श्री. नितिन शहापुरकर, श्री. उमेश सुरतकर, श्री. प्रकाश कुलकर्णी, श्री. मिलिंद तट्टू आणि इतर सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. अर्थात सर्व बडोदेकर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ यांचे कौतुक.

तसेच मध्यवर्ती मंडळ मुंबईच्या सर्व कार्यकारी सदस्य, इतर संस्था आणि प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे कार्यक्रमास हातभार लावणारे आणि प्रामुख्याने श्री. विलास जोशी, श्री. प्रभाकर कुलकर्णी, श्री. मिलिंद सरदेशमुख, श्री. आनंद कुलकर्णी आणि अन्य क्रियाशील सभासद यांचेही अभिनंदन.

मी या आधी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ किंवा कोणत्याच समाज संमेलनात गेलो नव्हतो, पण इतर काही मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन आणि उपस्थिती जवळून पाहिली असल्याने, एक नक्की म्हणु शकतो की, आपण एक बेंचमार्क निर्माण केला आहे. आणि पुढे आपल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाच्या कोणत्याही संमेलनासाठी तो आदर्श निर्माण झाला आहे.

संमेलनासाठी निवडलेली जागा खूपच पावन होती. तिथे येताच खूप सकारात्मक स्पंदने जाणवली. आणि पुढे २ दिवस आपले आयोजन किती उत्तम प्रतीचे आहे हे सर्वांना अनुभवता आले. मला वाटते आपल्या सर्व ६०० च्याहून अधिक उपस्थित असलेल्या सभासद बंधू आणि भगिनींना असेच वाटलं असणार. एकूण सर्व कार्यक्रम उत्तम झाले. आपल्या टीम च्या अथक प्रयत्नाने ते शक्य झाले.

रविवारी शेवटी अर्धा ते एक तास सर्वजण खुपच भावूक झाले होते. आणि आपण सर्वजण खऱ्या अर्थाने एका मोठ्या कुटुंबाचे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण) एक सदस्य आहोत याची जाणीव होत होती. हीच कार्यक्रमाची खूप मोठी उपलब्धी असे माझे प्रांजळ मत आहे. सभागृहात बसण्यास जागा नव्हती. इथेच कार्यक्रम किती उत्तम झाला आणि सर्वांना आवडला हे लक्षात येते.

आपल्या सर्वांचे परत एकदा अभिनंदन आणि उपस्थित सभासदांना त्याचा अनुभव घेता आला त्याबद्दल मनःपूर्वक आभार.

**प्रताप रांजणगावकर, बडोदा (गुजरात)** : श्री. मिलींद सरदेशमुख व श्री. आनंद कुलकर्णी यांचे उत्तम सूत्रसंचालन. अशोक नायगावकर यांचा यकविता मिश्किलेच्या गावील हा विनोदी कार्यक्रम छान झाला. सचिन खेडेकर यांची मुलाखत अविस्मरणीय होती. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत श्री. मिलिंद सरदेशमुख व श्री. आनंद कुलकर्णी यांनी दाखविलेला व मांडलेला देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाच्या इतिहासाचा स्लाईड शो उत्तम होता. मनोरंजन कार्यक्रमात गरब्याचे उत्तम सादरीकरण झाले. या परिषदेस उपस्थित राहण्याचा योग आला याबद्दल अभिमान वाटतो.

**डॉ. वैजयंती पतकी, उपाध्यक्ष (दे.ऋ.ब्रा.संघ, कल्याण)** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, वडोदरा आयोजित राष्ट्रीय परीषद यशस्वी झाल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. या परिषदेत जी स्मरणिका प्रकाशित करण्यात आली आहे ती अतिशय माहितीपूर्ण अशी आहे. मुखपृष्ठाची रचना अत्यंत सुरेख व आकर्षक रंगसंगतीची आहे. पूर्ण स्मरणिकेची रचना आणि त्यातील माहिती पृष्ठ खूप छान व वाचनीय आहेत. आणखी एक विशेष गोष्ट जी मला आवडली ती म्हणजे सर्व संस्थांची ओळख तसेच कार्यकारिणी सदस्य आणि पदाधिकारी यांची नावं आणि थोडक्यात ओळख ही दिलेली आहे ही गोष्ट मला जास्त आवडलेली आहे. त्यानिमित्ताने सर्व संस्थांची आपल्याला माहिती मिळाली. स्मरणिकेची मांडणी अत्यंत आकर्षक आहे. सर्व पदाधिकाऱ्यांचे, कार्यकारिणीचे आणि स्मरणिकेसाठी आणि परिषद यशस्वी होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मेहनत घेतलेली आहे त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

# संलग्न संस्था वृत्त

**बेळगांव** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबई यांच्या वतीने दरवर्षी दिली जाणारी शैक्षणिक मदत वाटण्याचा कार्यक्रम यंदा नुकताच समर्थ सोसायटीच्या मारुती गल्ली येथील हॉलमध्ये संपन्न झाला. आजवर विद्यार्थ्यांना एक लाख रुपये पर्यंतची शैक्षणिक मदत देण्यात आली असल्याची माहिती विनायक जोशी यांनी दिली. याप्रसंगी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ बेळगाव चे उपाध्यक्ष सुधीर जोशी ,कार्याध्यक्ष सुहास कुलकर्णी, कार्यवाह विनायक जोशी, खजिनदार अभय जोशी आणि समर्थ चे व्यवस्थापक अरविंद कुलकर्णी हे उपस्थित होते. सुहास कुलकर्णी यांनी उपस्थित यांचे स्वागत करून संघाच्या कार्याची माहिती दिली तर सुधीर जोशी यांनी आभार मानले याप्रसंगी राघवेंद्र केसनुर यांच्यासह बेळगाव, उगार निपाणी आदी भागातील विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होता.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था (मुलुंड) तर्फे 'गीता पठण' आयोजित करण्यात आले होते. भगवद् गीतेच्या १८अध्यायाचे पठण करण्यात आले. त्यानंतर विष्णु सहस्त्रनामाचे पठण करण्यात आले. भगवद् गीतेची आरती करून, प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण संस्थेच्या वतीने रविवार दिनांक ०४ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता छत्रपती शिक्षण मंडळाच्या, अभिनव विद्या मंदिर शाळेच्या, आनंदी गोपाळ सभागृहात अधिवक्ता डॉ. उदय वारुंजीकर, उच्च न्यायालय यांचे 'ग्राहक संरक्षण कायदा व आपण' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष विलास जोशी हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण संस्था अध्यक्ष सुरेश कुळकर्णी व पदाधिकारी यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी संस्थेच्या तीस वर्षांच्या कार्याची माहिती दिली. तसेच लवकरच स्वतःच्या मालकीचे नवीन कार्यालय घेणार असल्याची माहिती उपस्थित मान्यवरांना दिली. भारतीय नौसेना दिन असल्याने १९७१ च्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या नौसैनिकांना तसेच आपल्या संस्थेचे तसेच मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष माजी शिक्षक आमदार कै. प्रभाकर संत. तसेच आपल्या मुलुंड संस्थेचे संस्थापक कै. विलासराव कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर अधिवक्ता मंदार कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचे कारणस्वरुप मांडले, तसेच दोन्ही मन्यवरांचा परिचय करुन देण्यात आला. विलासराव जोशी यांच्या हस्ते वडोदरा येथील ऋग्वेद परिषदेत माजी आमदार कै. प्रभाकर संत, यांना जाहीर करण्यात आलेला मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार संत सरांचे चिरंजीव मनोज/मंगेश संत यांना शाल, श्रीफळ, पुष्प गुच्छ, सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# भांडवल बाजार चढ-उतार आणि तक्रारींचे निवारण

**उदय तारदाळकर (मो. : ९९२०८०५८२२)**

भांडवल बाजारात मार्च २०२० पासून खूप मोठ्या प्रमाणात उलथापालथ झाली. कोरोनाच्या महामारीने अर्थव्यवस्थेचा कणा मोडला होता. आर्थिक क्षेत्र पूर्णतः ठप्प झाले. अर्थातच त्याचा परिणाम भांडवल बाजारावर झाला. क्रित्येक कारणांमुळे भारताचा २०१९-२०२० चा विकास दर बेताचा होता. केंद्र सरकारने केलेल्या कंपन्यांवरील कर कपातीमुळे काही प्रमाणात आशा निर्माण झाली होती. परंतु २०२०-२०२१ वित्तीय

वर्षाची सुरुवात कोरोनामुळे खराब झाली. कोविडच्या उद्रेकानंतर समभागामधील विक्रीमुळे २०२० च्या पहिल्या तीन महिन्यात भांडवल बाजार हळूहळू सावरू लागला. २०२१-२०२२ ह्या काळात शेअर बाजारातील निर्देशांक सुमारे ७० टक्क्यांनी वाढला. एकीकडे शेअर निर्देशांक सुधारत असताना गुंतवणुकीची संधी सुटू नये म्हणून गुंतवणूकदार सतर्क झाले. बाजारात परदेशी संस्था मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत होत्या आणि किरकोळ गुंतवणूकदार पण ह्या लाटेत सामील झाले. सार्वजनिक वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात निर्बंध असल्याने राहत्या घरातून काम करणे ही नवी संकल्पना सर्वांच्या अंगवळणी पडू लागली. त्यातून ऑन लाईन व्यवहार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. एप्रिल २०२० ते जून २०२१ ह्या कालात डिमॅट खातेदारांची संख्या चार करोड पासून तब्बल सहा करोड पर्यंत पोहोचली आणि आता सप्टेंबर २०२२ ला दहा करोडच्या घरात गेली. १९९६ साली डिपॉझिटरी प्रणाली सुरु झाली. चार करोड खात्यांचा पल्ला गाठण्यास २५ वर्षे लागली तर त्या नंतरची सव्वा दोन करोड खाती अवघ्या सव्वा वर्षात उघडली. तीन वर्षात डिमॅट खाती तिपटीने वाढली.

वाढती महागाई आणि बँकांच्या मुदत ठेवींवरचे घसरते व्याज दर अशा विवंचनेत असलेले गुंतवणूकदार भांडवल बाजाराकडे वळले. महागाईचा दर सहा ते सात टक्क्यांच्या आसपास आणि दीर्घ मुदत ठेवींवरील व्याज पाच ते साडे पाच टक्क्याच्या पट्ट्यात असताना भांडवल बाजारासारखा जोखमीचा परंतु अधिक परतावा देण्याची उमेद असणारा पर्याय गुंतवणूकदारांनी निवडला. गुंतवणूकीस वाजवी परतावा मिळवणे आणि मूळ रक्कम सुरक्षित ठेवून योग्यती जोखीम घेणे जरूरीचे असते. घटत्या व्याज दराच्या काळात नवे पर्याय शोधणे अनिवार्य आहे. शेअर बाजारात तेजी आणि मंदीचे चक्र चालू असते. काही कंपन्यांचे भाव अशा तेजी मंदीच्या चक्रातसुद्धा टिकून असतात. दीर्घकालीन गुंतवणूकदारांनी तात्पुरत्या चढ-उताराची चिंता करू नये आणि पद्धतशीरपणे गुंतवणूक सुरु ठेवावी. भांडवल बाजारात तुम्ही गुंतवणूक किती काळासाठी करता ह्यावर तुम्ही गुंतवणूकदार आहात का समभागात व्यापार करता हे ठरते.

भांडवल बाजारात समभागांचे भाव काही घटकांमुळे खालीवर होत असतात. अर्थातच हे भाव खाली वर जाण्यास मागणी आणि पुरवठा हे अर्थशास्त्रातील तत्व लागू पडते.

भांडवल बाजारात समभागांचे भाव खाली वर होण्यास प्रवृत्त करणारे काही घटक खालीलप्रमाणे :

राष्ट्रीय अर्थव्यवस्था, परदेशी गुंतवणूक, किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग, राष्ट्राचा विकासाचा दर, जागतिक अर्थव्यवस्था, राजकीय स्थिरता, सरकारी धोरण

**शिस्तबद्ध गुंतवणूक :** भांडवल बाजारात गुंतवणूक करताना काही गोष्टी कटाक्षाने पाळल्या पाहिजेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कर्जाऊ पैसे घेऊन ते काही दिवसांत दुप्पट होईल या आशेने गुंतवणूक करणे फार जोखमीचे असते. भांडवल बाजारात आणि मुख्य म्हणजे समभागात गुंतवणूक करताना कशाचीही शाश्वती नसते. आपण घेतलेले कर्ज व्याजासह परत फेडावे लागते. भांडवल बाजाराकडून अजून एक अपेक्षा म्हणजे झटपट श्रीमंत होणे. गुंतवणूकदारांनी अल्पावधीत भरघोस परताव्याची अपेक्षा करु नये. दीर्घकाळ गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळू शकतो. एखादी कंपनी जेव्हा चांगले उत्पादन करून त्यावर चांगले उत्पन्न कमविते तेव्हा अशा समभागांची किंमत वाढते. परंतु अल्पवधीत मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवणे घातक ठरू शकते. एखादा समभाग खरेदी केल्यानंतर दररोज त्याच्या किमतीकडे पाहू नये. चांगले प्रवर्तक, सुसंगत सरकारी धोरण आणि उत्कृष्ट व्यवसाय करण्याचे धोरण असेल तर कंपनी निश्चितच चांगला परतावा मिळवून देईल. शिवाय अशी गुंतवणूक करताना कोणत्या भावाला आपल्याला समभाग विकून आपला फायदा कागदावरून प्रत्यक्षात आपल्या खात्यात जमा करावयाचा आहे ह्याचे भान ठेवावे. तसेच आपला निधी वेगवेगळ्या क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गुंतवावा

जेणेकरून जोखीम कमी होऊन आपल्या पैशाचे संरक्षण होऊ शकते. विविध क्षेत्रात गुंतवणूक केल्यास एखाद्या क्षेत्राला कठीण काळ आला तर इतर क्षेत्रांची वाढ झाल्याने तुमच्या गुंतवणूकीचा समतोल राखता येईल. कोणत्यातरी मित्राच्या किंवा दलालाच्या सल्ल्यावरून समभाग विकत घेऊ नयेत. त्यासाठी आपण स्वतः कंपनीच्या मूलभूत घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. घरात धुलाई यंत्र किंवा टीव्ही घेताना चार ठिकाणी चौकशी करून योग्य ती सूट मिळवण्याचा आपण प्रयत्न करतो, पण लाखो रुपयांचे समभाग एका क्षणात खरेदी केली जाते हे टाळले पाहिजेय काही निर्णय चुकल्यास किंवा सरकारी धोरण बदलल्यास समभागांचे भाव खाली आले तर ताबडतोब तोटा सहन करून समभाग विकणे उचित असते. भांडवल बाजारात जास्तीत जास्त नफा कमावताना कमीत कमी तोटा यावा असे धोरण असणे आवश्यक आहे. काहीवेळा भाव खाली आल्यावर आपण खरेदीचा सरासरी भाव कमी करण्यासाठई अधिक खरेदी केली जाते. अशावेळी समभाग चांगले असल्याची खात्री असल्याशिवाय जास्त जोखीम घेणे उचित नाही. सरते शेवटी आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की आपल्या दीर्घ मुदतीच्या गरजांनुसार भांडवल बाजारात गुंतवणूक केली पाहिजे. प्रत्येक गुंतवणूकदाराची जोखीम क्षमता ही वेगवेगळी असते. सरसकट मिळणाऱ्या एखाद्या सल्ल्यावर किती गुंतवणूक करायची हे आपल्या बचतीच्या कुवतीवर आणि आपण कोणत्या वयोगटात आहोत ह्यावर अवलंबून असते. यसुक्या बरोबर ओले ही जळतेल अशी एक म्हण आहे. परंतु भांडवल बाजारात परिस्थिती काहीप्रकारे वेगळा अनुभव देते. भांडवल बाजाराच्या बाबतीत तेजीच्या काळात चांगल्या समभागांबरोबर कमकुवत असलेल्या कंपन्यांचे भावही वाढतात. अशा समभागांना झहहब एूदम्बे असेही म्हणतात. साधारणतः अशा कंपन्यांचे भाव तेजीच्या काळात वाढतात आणि नंतर कोसळतात. गुंतवणूकदारांनी सतर्क राहणे जरूरीचे आहे. ह्या कंपन्यांचे भाव साधारणतः खूप कमी म्हणजे एक अंकी असतात. मुंबई स्टॉक एक्सजेन्जने काही कंपन्यांना यैंल श्रेणीमध्ये ठेवले आहे. ज्या कंपन्या एक्सचेंजच्या सूचीबद्धतेनुसार कायदे पालन करीत नाहीत, किंवा आवश्यक माहिती पुरविण्यास असमर्थ असतात अशा कंपन्या यैंल श्रेणीमध्ये आहेत. जुलै १९९९ साली काही कंपन्याचा समावेश ह्या श्रेणीमध्ये केला. अशा कंपन्यात गुंतवणूक करणे धोक्याचे असते. यैंल श्रेणीच्या कंपन्यांमध्ये गुंतवणूकदारांच्या तक्रारींचे निराकरण न करणे आणि त्यांच्या समभागांच्या सर्टिफिकेट्सचे डिमटेरियलायझेशन करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था न केल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. आतापर्यंत या श्रेणीमध्ये सुमारे ३,४०० कंपन्या आहेत.

**भांडवली बाजार आणि गुंतवणूकदारांचे तक्रार निवारण :** भांडवल बाजारात गुंतवणूकदाराच्या हिताचे संरक्षण असणे आवश्यक आहे. गुंतवणूकदार हे भांडवल बाजाराचा कणा आहेत. भारतातील गुंतवणूकदारांच्या संख्येत होणारी वाढ उत्साहवर्धक आहे. सध्या असा काळ दिसून येत आहे की मुच्युअल फंडा व्यतिरिक्त किरकोळ गुंतवणूकदार समभागांमध्ये गुंतवणूक करीत आहेत. परंतु बऱ्याच गुंतवणूकदारांकडे गुंतवणूकीची माहिती घेण्याकरिता पुरेसे कौशल्य/ज्ञान नसते. त्यापैकी काही गुंतवणूकदारांना मार्केट मध्यस्थांशी व्यवहार करताना त्यांनी कोणती खबरदारी घ्यावी याची पूर्णपणे माहिती नसते. भांडवली बाजारातील गुंतवणूकदारांच्या तक्रार निवारणासाठी मसेबीय ने उभारलेल्या ऑनलाइन तक्रार निवारण यंत्रणेमुळे तक्रारींचा निपटारा करण्याचा वेग वाढला आहे. यामुळेच प्रलंबित तक्रारींत घट होऊन हे प्रमाण खाली आले आहे. सेबीने मस्कोअर्सय ही ऑनलाइन तक्रार निवारण यंत्रणा सुरु केल्याचा मोठा फायदा झाला आहे.

खालील प्रकारच्या तक्रारी स्टॉक एक्सचेंज सदस्यांचे विरुद्ध करता येतात :

१. विना संमती व्यवहार करणे. २. सदस्यांकडून केवायसी कागदपत्रांची प्रत न मिळणे. ३. सदस्यांकडून

तारण म्हणून दिलेला निधी/समभाग न मिळणे. ४. लाभांश / व्याज / बोनस इत्यादी न मिळणे. ५. मिळालेली किंवा लावलेली लिलाव किंमत आणि दंड. ६. सदस्यांनी लावलेली जास्तीची दलाली. ७. खतावणीप्रमाणे शिल्लक रक्कम न मिळणे. ८. व्यवहारांच्या उलटपक्षी व्यवहार.

कोणत्या तक्रारींचे निवारण करीत नाही?

गुंतवणूकदार सेवा विभाग खालील प्रकारच्या तक्रारींचे निवारण करू शकत नाही.

एक्सचेंज सदस्यांविरुद्ध तक्रारी :

१. ज्या व्यवहारासंबंधी लवाद प्रक्रिया सुरू आहे त्या संबंधीच्या तक्रारी. २. प्रतिकात्मक तोटा/संधी वाया जाणे या संबंधीच्या मागण्या किंवा दावे. ३. व्यवहार न झाल्याच्या तक्रारी. ४. सदस्य सोडून इतर व्यक्तींना दिलेले निधी किंवा समभागाबद्दल तक्रारी. ५. उपदलालांबरोबर केलेला वैयक्तिक व्यवहार. ६. सदस्यांव्यतिरिक्त कोणालाही दिलेली रक्कम. ७. कोणत्याही तिसऱ्या व्यक्तिने केलेल्या नेमक्या टक्केवारीचा फायद्याचा वायदा. ८. ज्या संस्था सेबी ह्या नियमकाच्या नियंत्रणाखाली येत नाहीत त्यांच्या विरुद्धच्या तक्रारी.

विवादांच्या विस्तृत चार बाबींचे विश्लेषण करूया आणि गुंतवणूकदारांनी काय खबरदारी घ्यावी याचा विचार करू या :

१. **अनाधिकृत व्यवहार :** केवायसीची अटी व शर्ती न वाचणे, जोखीम प्रकटीकरण कागदपत्रे न ठेवणे अशा गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास बरेच वाद होऊ शकतात. एक्सचेंजमध्ये नोंदविलेल्या तक्रारी प्रामुख्याने अनाधिकृत व्यवसायाशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे. १ एप्रिल २०१८ पासून एक्सचेंज सदस्यांनी व्यवहारांपूर्वी गुंतवणूकदाराची संमती घेणे अनिवार्य आहे. याची गुंतवणूकदारांना माहिती असणे आवश्यक आहे. दलालांना व्यवहार-पूर्वसूचनाची नोंद मेल, कॉल रेकॉर्डिंग इ. च्या स्वरुपात ठेवणे आवश्यक आहे. जे गुंतवणूकदार तपशील न समजता व्यवहार अंमलात आणण्यास मान्यता देतात त्यांना बऱ्याच वेळा तोटा सहन करावं लागतो. काहीवेळा दलालांच्या डीलर्स / रिलेशनशिप मॅनेजर जवळीक करून फायद्याचे आमिष दाखवितात आणि गुंतवणूकदार फोनवर आपली संपती देऊन बसतात आणि बळी पडतात. काही व्यवहारात विशेषतः किमतीने कमी असलेल्या समभागांच्या व्यवहारात मिळणाऱ्या फायद्यापेक्षा दलालांना मिळणारे कमिशन / वैधानिक शुल्क / कर जास्त असतो अशावेळी गुंतवणूकदारांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमुळे गुंतवणूकदार आणि दलाल आपल्या रिलेशनशिप मॅनेजरच्या म्हणण्याप्रमाणे हो ला हो म्हणतात. दलालांकडून प्राप्त झालेल्या एस.एम.एस. संदेश / ई मेलकडे दुर्लक्ष करण्याकडे गुंतवणूकदारांचा कल असतो. कोणताही अनाधिकृत व्यापार झाल्यास ही बाब त्वरित दलालांच्या निदर्शनास आणून व्यापार थांबविण्याची विनंती करावी.

२. **मार्जिनच्या अभावी व्यवहारांची उलटपक्षी व्यवहार :** दलाल आणि गुंतवणूकदार यांच्यात विवादांचे आणखी एक कारण म्हणजे उलटपक्षी व्यवहार. गुंतवणूकदारांना दलालांचे जोखीम धोरण समजून घेणे आवश्यक आहे आणि आवश्यक तेथे मार्जिन पुन्हा भरण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. अस्थिर बाजारपेठेत दलाल संगणकाच्या साहाय्याने आणि कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय उलटपक्षी व्यवहार करण्याचे धोरण स्वीकारतात. जर गुंतवणूकदाराला आपण केलेल्या व्यवहाराची स्थिती अबाधित ठेवायची असेल तर पारंपारिक धनादेशाऐवजी ऑनलाईन पैसे देण्याची पद्धत वापरावी लागेल.

३. **नफा वाटून घेणे :** असे निदर्शनास आले आहे की गुंतवणूकदार सदस्याच्या कर्मचाऱ्यांशी किंवा उपदलालांशी संगनमत करून निश्चित नफा मिळण्यासाठी तोंडी व्यवहार करतात. अशा करारास कोणतेही कायदेशीर बंधन नसते. कधीकधी सुरवातीच्या टप्प्यावर फायदा होतो परंतु नंतर मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

अशा नुकसानीची परतफेड करण्यासाठी पुन्हा मोठ्या रकमेचा व्यवहार केला जातो. असे चक्र चालू राहते आणि सरतेशेवटी गुंतवणूकदार आपली सर्व गुंतवणूक घालवून बसतो.

४. **निधी किंवा समभाग विलंबाने मिळणे :** भांडवल बाजारात व्यवहाराची पूर्तता ही व्यवहाराच्या तिसऱ्या दिवशी होते. त्यानंतर २४ तासात समभाग किंवा निधी गुंतवणूकदाराला देणे दलालांना बंधनकारक आहे. आपण केलेल्या व्यवहारासाठी मार्जिन देणे बंधनकारक असल्याचे दलाल त्यासाठी आपला निधी राखून ठेवू शकतो. काहीवेळा रोज किंवा वारंवार व्यापार करणारे गुंतवणूकदार दलालांना आपला निधी राखून ठेवण्याचा अधिकार देतात अशावेळी २४ तासांचे बंधन लागू नसते.

प्रत्येक गुंतवणूकदारांना नुकसान भरपाई देण्यासाठी एक निधी असतो. हा निधी एखादा सदस्य दिवाळखोर झाला किंवा ज्या सदस्याकडे त्याची मालमत्ता गुंतवणूकदारांच्या मान्य केलेल्या दाव्याची पूर्तता करण्यासाठी पैसे पुरेसे नसतात तेव्हा ह्या निधीचा वापर केला जातो. गुंतवणूकदारांच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्याबरोबरच जनजागृती करण्यासाठीही ह्या निधीचा वापर केला जातो. बाजार नियंत्रक सेबीने ह्यासाठी एक ट्रस्ट स्थापन करणे अनिवार्य केले आहे आणि ट्रस्टमधील एक सदस्य गुंतवणूकदारांच्या असोसिएशनमधील असतो. सेबी / एक्सचेंजने ठरविल्याप्रमाणे गुंतवणूकदार / ग्राहकांचे शिक्षण, जनजागृती कार्यक्रम देण्याचे कार्य ट्रस्ट करत असतो. असे असले तरी प्रत्येक गुंतवणूकदाराने सजग राहून गुंतवणूक करावी आपल्या पैशाची जबाबदारी स्वतः घेऊन परावलंबी राहू नये.

## Attracting Gen Next to our Sanstha De Ru Bra

Here is an example of how the next generation has shown keen interest and also delivered the goods to the 100% satisfaction of the dignitaries who attended the Vadodara Convention!



Yes, I am talking of non other than the Volunteer who was incharge of transport arrangements for picking and dropping the dignitaries, and the flawless execution was done by he and his colleagues! This is amazing indeed ! The young boy responsible for this recognition is non other than our own **Mr. Purnendu Nitin Shahapurkar**. A young working professional who is an engineer by profession working in Pune was there like a string pillar to shoulder the responsibility of his father and President of Vadodara convention **Shri Nitin Shahapurkar** He gave the work his son liked and the execution was so flawless that all the guests were in praise for this young Mr Purnendu Shahpurkar.

The arrivals and departure were erratic and the smile on this young boy and his teams face was always encouraging and welcoming ! I saw midnight 2 am also was

not a Challange for these children ! I could sense a great leadership quality in Purnendu.

I could see him empowering his team to take decisions, I could see resilience never say die attitude, I could see lead from front, I could see patience, I could see contagious enthusiasm in the leader Purnendu.

I am sure this experience will make him a great emerging leader of tomorrow!

Next generation needs to be given a task and just supervised from distance them and they perform miracles you see!

Purnendu Shahpurkar kudos to your leadership and kudos to your organisation capability !

We wish you all the best and profoundly thank you for making all the dignitaries comfortable ! Keep up the good job.

## ॲड. दिपक भास्कर केसकर यांना आयडॉल ऑफ महाराष्ट्र पुरस्काराने सन्मानित



सोलापुर येथील ॲड. श्री. दिपक भास्कर केसकर यांना सकाळ समुहातर्फे दिला जाणारा आयडॉल ऑफ महाराष्ट्र हा मानाचा पुरस्कार देण्यात आला. श्री. दिपक केसकर यांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण अक्कलकोट-सोलापूर येथे झाले. निसर्गमित्र आणि प्राणीमित्र असलेल्या श्री. केसकर यांचे सामाजिक कार्य खूप मोठे आहे. सोलापूर बार असोसिएनचे माजी उपाध्यक्ष, लोकमंगल को. ऑप. मल्टीस्टेट सोसायटी या संस्थेचे आर्बीटेटर, बँक ऑफ इंडिया, एस.टी. महामंडळ, विदर्भ कोकण बँक लि., केसरी टुर्स, अरुणोदय मल्टीस्टेट को. ऑ. क्रेडिट सोसायटी इ. संस्थांवर कायदेविषयक सल्लागार म्हणून ते कार्यरत आहेत. एस.टी. महामंडळाच्या बाजूने एका खटल्यात माळशिरस येथे महामंडळाच्या विरुद्ध व्याजासह जवळपास ५ कोटीची मागणी असलेला दावा महामंडळाच्या बाजूने निर्णय घेण्यामागे त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सोलापूर जनता बँकेच्या कर्जदारांवर फौजदारी कार्यवाही दाखल करून जवळपास २२ कोटीची वसुली बँकेस मिळवून दिली. या अशा अनेक खटल्यांमध्ये श्री. केसकर यशस्वी झाले आहेत. प्राणी आणि पक्षांना उन्हाळ्यात व इतर ऋतूमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे महान कार्यही अव्याहतपणे ते करीत असतात. तसेच निसर्गाची आवड जोपासणारा प्रसिद्ध कायदेतज्ञ म्हणून त्यांची आज ओळख आहे.

ॲड्. श्री. दिपक केसकर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे सन्माननीय सभासद आहेत. त्यांच्या पुढील सामाजिक कार्यास अनेक शुभेच्छा.

**शब्दांकन : मिलिंद सरदेशमुख**

# वडोदरा येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय रौप्य महोत्सवी परिषदेत ज्ञातीतील खालील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

## सत्कारमूर्ती

**ऋग्वेदीय भूषण**
श्री. भाऊराजे जहागीरदार
डॉ. हरी महाशब्दे
श्री. सचिन खेडेकर
डॉ. श्रीकांत येळेगावकर
सौ. ऋता कळमणकर
श्री. प्रवीण दिक्षित
ले. जनरल संजय कुलकर्णी
श्री. अविनाश धर्माधिकारी
श्री. आशुतोष राराविकर
श्री. अरविंद नांदापुरकर
श्री. अतुल खिरवाडकर
श्री. शरदचंद्र झरेगांवकर
श्री. मोहनबुवा रामदासी
डॉ. प्रशांत सुरु
डॉ. निरज रायते
श्री. प्रमोद देशमुख
श्री. उदय तारदाळकर
श्री. संदीप देवरे
श्री. डिधोळकर
डॉ. दिपक करंजीकर

**उद्योग भूषण**
श्री. विलास जोशी
श्री. मुकुंद कुलकर्णी (नाशिक)
श्री. श्रीराम कुलकर्णी
श्री. संतोष मेकल
डॉ. टाकळकर
डॉ. जितेंद्र जोशी

**समाज भूषण**
सौ. मंजिरी कारुळकर
सौ. मंजूषा कुलकर्णी
श्री. तुषार देशपांडे

**जीवन गौरव**
ॲड. माधव दत्तात्रय अनगळ
आमदार प्रभाकर अनंत संत
कै. महादेव विष्णू उर्फ तात्या जोशी

**समाजभूषण वडोदरा**

श्रीमती उषा ताई जठार, श्रीमती कलावती कोठारी, श्री. नंदकुमार पद्माकर कानडे, मेजर केळुसकर, श्री. लक्ष्मण करंजगावकर, श्री. सुभाषचंद्र टाकळकर, श्री. अवधूत सुमंत, श्री. सुषम पालेकर, श्री. विक्रम खिडकीकर, संस्कार मंडळ वडोदरा (कल्पना खोत, नलिनी खेर व कुलकर्णी), श्री. जीवन गोले, श्री. बाळकृष्ण शुक्ल (माजी खासदार), श्री. प्रतापराव भोईटे, श्री. गौरव पवळे,

## अभिनंदन
## नाशिक देशस्थ ऋग्वेदी संस्थेची निवडणूक बिनविरोध

सन २०२२-२३ ते २०२७-२८ या पंचवार्षिक निवडणूकीसाठी ॲड. पराग माळवदकर तसेच सहाय्यक श्री. सतिश भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक देशस्थ ऋग्वेदी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध संपन्न झाली.

संस्थेचे अध्यक्ष सर्वश्री. मुकुंदराव कुलकर्णी, उपाध्यक्ष संजयकुमार क्षीरसागर, कार्याध्यक्ष सुहास पाटील, कार्यवाह मकरंद सुखात्मे, सहकार्याध्यक्ष मंदार तगारे, सहकार्यवाह राजेंद्र खेडलेकर, हेमंत कुलकर्णी, खजिनदार विनायक एडगावकर, विश्वस्त एम. ई. कुलकर्णी, सी. व्ही. कुलकर्णी, व. य. कुलकर्णी, रविंद्र वाडीकर हे बिनविरोध निवडून आले. कार्यकारी मंडळाच्या १३ जागांसाठी सर्वश्री. अशोक कुलकर्णी, अजय चौधरी, सचिन निरंतर, संदीप गोसावी, राजेंद्र हातवळणी, दिगंबर कुलकर्णी, किशोर हिंगणे, अनंत दशपुत्रे, निषाद दशपुत्रे, विशाल शिंगवेकर, रोहीत कुलकर्णी, पंकज उंदीरवाडकर, प्रशांत निरंतर हे ही बिनविरोध निवडून आले. महिला शाखेच्या कार्यध्यक्षा सविता प्रदीप कुलकर्णी, सहकार्याध्यक्षा स्वाती भडकमकर, सहकार्यवाह स्नेहल खेडकर, कार्यवाह सुजाता करंजीकर व इतर कार्यकारिणी सदस्य यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. या सर्वांचे अभिनंदन आणि नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा.

# जोडीदार निवडा

**वधू पाहिजे**...........................................................................................................................

● नाव - **ओमकार मधुसूदन जोशी**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - १५.०९.१९९५, वार - शुक्रवार, जन्म वेळ - दुपारी १२.१०, जन्म स्थळ - नालासोपारा, गोत्र - भारद्वाज, रास - वृषभ, नक्षत्र - रोहिणी, प्रथम - चरण, गण - मनुष्य, नाडी - अंत्य, रक्तगट - O+ve, मंगळ - आहे, उंची - ५.६, बांधा - मध्यम, चष्मा/लेन्स - नाही, रिडींग ग्लास, शारिरीक व्याधी/व्यंग - नाही, शिक्षण - BMM (Mass Media) + Travel Tourism, नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) - Visa Executive at Thomas Cook (India) Ltd; Mumbai, सर्वसमावेशक वार्षिक पगार - ४ लाख, छंद/कला आवड - फोटोग्राफी, प्रवास, ट्रेकिंग, अपेक्षा - प्रथम वधू-शक्यतो स्वजातीय, उंची ५.४ पर्यंत, वयात ३-४ वर्षे अंतर अपेक्षित, पदवीधर-नोकरी करणारी, वर्ण - गोरा, गव्हाळ, एकत्र कुटुंबात राहण्याची सवय, आवड. सुस्वरुप, प्रेमळ, समजूतदार. पत्रिका पहायची आहे. सगोत्र नको. संपर्क - मधुसूदन जोशी ९८२१०८६५९१, सौ. अनुजा जोशी ९९६०८५९७५२, ओमकार जोशी ९१५८४५७२३१, पत्ता - प्लॉट नं. २६, विद्या-मेधा, विवाकुटीर, रोठा फाटक, केळवे रोड (पूर्व), तालुका-जिल्हा-पालघर-४०१४०१.

● नाव - **शुभंकर अरविंद सकळकळे**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २०.०८.१९९४, रक्तगट - O+ve, गोत्र - भारद्वाज, रास - मकर, नक्षस्त्र - श्रवण, अन्त्य नाडी, देव गण, चतुर्थ चरण, उंची - ६, बांधा - मध्यम, वर्ण - निमगोरा, जन्म स्थळ - जळगाव (खान्देश), शिक्षण - B.E. (Electronics & Tele Communication), नोकरी - IT Company, New Jersey America, अपेक्षा - अनुरुप, समव्यवसायाची व इतर व्यवसायातील चालेल, उच्चशिक्षित, नोकरी करणारी वा इच्छुक, संपर्क - अरविंद रामचंद्र सकळकळे ९९६९७२६१९५, सौ. सुलभा अरविंद सकळकळे ९८६९९८२४०५, पत्ता - इमारत क्र. १८, ए विंग, फ्लॅट नं.१०२, अजिंक्य को.ऑ.हा.सोसायटी, बिंबीसार नगर, गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०००६५.

● नाव - **आनंद विजय चाव्हरे**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २०.०९.१९८९, शिक्षण - १२ वी कला, नोकरी - सहकारी बँक, कल्याण, गोत्र - वसिष्ठ, उंची - ५.५, चष्मा - नाही, वर्ण - गहू वर्ण, जन्म स्थळ - वरळी, मुंबई, बांधा - सडपातळ, रास - वृषभ, नक्षत्र - कृतिका, गण - राक्षस, नाडी - अंत्य, चरण - चतुर्थ, मंगळ - नाही, वडिलांचे नाव - विजय शांताराम चाव्हरे, आईचे नाव - जयश्री विजय चाव्हरे ८१०८७३५११८, पत्ता -ब-४०५, दैवराय सहकारी गृह संस्था, बाजार पेठ, पोलिस स्टेशन समोर, दुधनाका, कल्याण (पश्चिम) ४२१३०१. अपेक्षा - समकक्ष, गृहकृत्य दक्ष, कुठल्याही शाखेची चालेल, वयात अंतर चार ते पाच वर्षे.

● नाव - **ईशान सुनिल कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - २९.११.१९९३, जन्म वेळ - सकाळी ०९.०१, जन्म स्थळ - डोंबिवली, गोत्र - शांडिल्य, रास - वृषभ, नक्षत्र - रोहिणी, प्रथम - चरण, गण - मनुष्य, नाडी - अंत्य, वर्ण - गहू वर्ण बांधा - मध्यम, चष्मा - आहे, शिक्षण - BE (MECH); MBA (Mktg.), नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) - Lecturar in M/s. Jamboree Edu. Pvt. Ltd. Thane सर्वसमावेशक वार्षिक उत्पन्न - ८ लाख, अपेक्षा - सुयोग्य, अनुरुप, समकक्ष, संपर्क - सुनिल गोविंद कुलकर्णी ९८६९३००३२३, सौ. नेहा सुनिल कुलकर्णी ९३७२४९३०९०, पत्ता - ब/१०२, साई वैभव सहकारी गृह. संस्था, इंदिरा हॉस्पिटल जवळ, गावदेवी चौक, कल्याण (पश्चिम) ४२१३०१.

● नाव - **प्रथमेश नागेश कुलकर्णी**, जन्मतारीख - १५.०१.१९९५, जन्मवेळ - दुपारी २.२०, जन्मठिकाण - डोंबिवली, रास - मिथुन, गण - मनुष्य, गोत्र - कश्यप, शाखा - देशस्थ ऋग्वेदी, नक्षत्र - आद्रा, चरण - चतुर्थ, नाड - आद्य, उंची - ५.३, शिक्षण - एम.बी.ए. फायनान्स्, नोकरी - विप्रो टेक्नॉलॉजिस, हिंजेवाडी, पुणे, मासिक प्राप्ती - रु. २२,६००/-, अपेक्षा - किमान पदवीधर, अपेक्षा - अनुरूप, सुस्वभावी, कुटुंबवत्सल, पदवीधर किंवा उच्च पदवीधर, संपर्क - नम्रता कुलकर्णी (आई) ७८७५४९०९९९, ९६६५६१९१९१,

● नाव : **निनाद गिरीश कुलकर्णी**, ब्राह्मण पोटशाखा - देशस्थ ऋग्वेदी, जन्मतारीख - ०१.०१.१९९२, गोत्र - मुनीभार्गव, वर्ण - गोरा, रक्तगट - B+ve मंगळ - नाही, उंची - ५.४, बांधा - मध्यम, शिक्षण - B.E. (Elc), नोकरी - TCS, रास - वृश्चिक, गण - देव, नाडी - मध्य, चरण - प्रथम, अपेक्षा - अनुरुप, नोकरी, पदवीधर, संपर्क - ९३२६३१५७८२ / ९८६९५६३६०३, पत्ता - १८०५/१८ वा मजला, श्री जयंत गणेश कृपा, सदाशिव क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई ४००००४.

● नाव : **अनिकेत अतुल जोशी**, ब्राह्मण पोटशाखा - शुक्ल यजुर्वेदी, जन्मतारीख - २३.०१.१९९५, गोत्र - वत्स, वर्ण - गोरा, रक्तगट - A+, मंगळ - नाही, उंची - १६५ सेमी, बांधा - मध्यम, शिक्षण - १२ वी पास, नोकरी व ठिकाण/हुद्दा (पोस्ट) - समर्थ सहकारी बँकेत शिपाई पदावर कामाला, मासिक उत्पन्न रु. २०,०००/-, अपेक्षा - मुंबईत जॉब करून रहायला होकार असला पाहिजे, संपर्क - ९००४९६४७२१ / ९८६७३२७०४१, पत्ता - के/३०४, सोनम गोदावरी, पी/६, ओल्ड गोल्डन नेस्ट, मीरा रोड (पूर्व) ४०११०७.

(**टीप** : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील.)

**HD FIRE PROTECT PVT. LTD.**
**D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604.**
**Email : info@hdfire.com**

## Invites application for the following posts.

1) **Sales Engineers (multiple openings) – Fire protection products**
   - Qualification : BE or Diploma in Mechanical Engineering.
   - Minimum 5 years experience in B2B Sales of Industrial product like Machinery, Valves, Pumps, Instrumentation Products, etc.
   - Experience in preparing quotations, bids, tenders and answering technical queries of customers.
   - Strong communication, interpersonal and customer service skills needed.
   - Local Candidate (living in Thane) preferred.

2) **Sales Manager - Fire protection products**
   - Qualification: BE/Diploma in Engineering or Graduation in Scientific Field.
   - Minimum 8years experience in Sales & Marketing of Industrial products like machinery, Valves, Pumps, Instrumentation Products, etc.
   - Experience in managing sales teams and offering required technical & sales support to customers.
   - Occasional customer visits will be needed.
   - Strong communication, interpersonal and customer service skills needed.
   - Local Candidate (living in Thane) preferred.

3) **Sales Coordinators (multiple openings)**
   - Qualification: Graduate Degree.
   - Minimum 5 years experience in managing Back-office Sales order in ERP/Software, Coordination with Production Planning, Packing and Dispatch Teams.
   - Good communication skills.
   - Should be good in Excel and Word.
   - Local Candidate (living in Thane) preferred.

4) **Back Office Documentation and Sales Executives (multiple openings)**
   - Qualification: Graduate Degree.
   - Minimum 5 years experience in managing Back-office Sales Documentation.
   - Experience in ERP/Software, Coordination with Customers, Packing and Dispatch Teams.
   - Good communication skills.
   - Should be good in Excel and Word.
   - Local Candidate (living in Thane) preferred.

**Interested candidates are requested to apply – careers@hdfire.com**















HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH